गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १२ वा ● बुधवार २९ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 12 | Date : 29/05/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## काँग्रेस फक्त मतपेटीचं राजकारण करते : नरेंद्र मोदी यांची टिका



**झारखंड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज झारखंडमधील दुमका येथील जाहीर सभेत सत्ताधारी झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाच्या सरकारवर टीका केली. झारखंडमध्ये इतके सुंदर डोंगर आहेत, पण इथे फक्त नोटांच्या डोंगराची चर्चा होते. राज्यातील लोकांची फक्त लूट होत आहे, असा आरोप करत झामुमो आणि काँग्रेस फक्त मतपेटीचं राजकारण करत असल्याचा आरोप मोदींनी केला.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, मला एका माझ्या सहकाऱ्याने सांगितले की, लव जिहाद हा शब्द पहिल्यांदा झारखंडमध्ये वापरला गेला. तसेच आपल्या देशात रविवारी सर्वांना सुट्टी असते. जेव्हा आपल्या देशावर ब्रिटिशांचे राज्य होते, तेव्हा ख्रिश्र्चन समाज रविवारी सुट्टी घेत असे. ही परंपरा तेव्हापासून सुरू झाली. रविवार हा हिंदूंशी जोडलेला नाही, तर ख्रिश्र्चनांशी जोडलेला आहे. तब्बल २०० ते ३०० वर्षांपासून ही पद्धत सुरू आहे. मात्र यांनी (झारखंड सरकार) रविवारची सुट्टी काढून टाकली. तिथे शुक्रवारी सुट्टी असेल असे सांगितले. हिंदूंशी तर अडचण होतीच. आता तुमचा ख्रिश्र्चन समाजाशाही वाद आहे? हे काय चालू आहे?

पंतप्रधान मोदींनी झारखंडमध्ये रविवारच्या सुट्टीवरून विरोधकांना लक्ष्य केल्यानंतर आता काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी त्यांना उत्तर दिले आहे. आपल्या एक्स अकाऊंटवर एक व्हिडीओ पोस्ट करत पवन खेरा म्हणाले, पंतप्रधान मोदींनी रविवारची सुट्टी ख्रिश्र्चनामुळे मिळाली, असे सांगितले. देशाचे पंतप्रधान जेव्हा तोंड उघडतात, तेव्हा ते काहीतरी अजब बोलतात.

पूर्ण देश त्यांच्यावर हसत आहे. तुम्ही १० वर्षांपासून देशाचे पंतप्रधान आहात आणि तुम्ही प्रचारात रविवार, सोमवारची सुट्टी करत बसला आहात. १० वर्षात सत्ता असताना मग सुट्टी का बदलली नाही? देशात आणखी काही बदल करू शकला नाहीत, कमीतकमी सुट्टी तरी बदलायची होती.

## जिल्ह्यात रेशीमच्या उत्पादन वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**सोलापूर/प्रतिनिधी:** रेशीम उद्योग हा शेतीवर आधारित महत्वपूर्ण उद्योग असून रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. सोलापूर जिल्ह्यातील हवामान रेशीमचे उत्पादन घेण्यास पोषक आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील रेशीम शेतीचे क्षेत्र वाढवण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. जिल्ह्यात रेशीमचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढवण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित रेशीम उद्योग आढावा बैठकीत जिल्हाधिकारी मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी रोहयो चारुशीला देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, जिल्हा रेशीम विकास अधिकारी विनीत पवार, आत्माचे प्रकल्प संचालक मदन मुकणे, आरसिटी चे संचालक दीपक वाडेवाले, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे, कॅनरा बँकेचे विजय पाटील यांच्यासह रेशीम उत्पादक शेतकरी महेश होनमाने, कैलास वडते, गणेश मुळे, तुळशीराम विभुते आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यातील रेशीम शेतीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली पाहिजे. जिल्ह्यात रेशीम शेतीसाठी पोषक वातावरण असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये रेशीम शेतीबाबत जनजागृती करून रेशीम उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी रेशीम उद्योग वाढीसाठी आपापल्या विभागाच्या वतीने योगदान देण्यासाठी योग्य नियोजन करावे. सन २०२३-२४ मध्ये एक हजार पेक्षा अधिक क्षेत्रावर रेशीम शेती केली जात आहे. यावर्षी यात अधिक वाढ करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यात रेशीमचे उत्पादन वाढवण्यासाठी तुती लागवड कोश, उत्पादन कोष खरेदी या विषयाची सर्व माहिती जिल्हा रेशीम कार्यालय, कृषी विभाग, आत्मा, जिल्हा ग्रामोद्योग आदींनी शेतकऱ्यांना । **पान २ वर**

## अपघाताचा बनाव करून खून प्रकरणी चार जणांना अटक

**वाई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

खून करून अपघाताचा बनाव केल्याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेसह भुईंज पोलिसांना यश आले आहे. दि. १९ मे रोजी सुरूर पुलाखाली अपघातातील जखमी पडला आहे. म्बुलन्स व पोलीस पाठवा. या माहितीवरून भुईंज पोलिसांनी जखमीला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवून दिले. उपचारादरम्यान संबंधितांचा मृत्यू झाला. याबाबत भुईंज पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली होती.

याप्रकरणी माळावरची झोपडपट्टी, सुरूर तसेच सुरूर गावातील सीसीटीव्ही तपासण्यात आले. त्यामध्ये संशयित एका दुचाकीवरून दोघांच्यामध्ये संबंधित जखमीस बसवून घेऊन जात असल्याचे दिसून आले. त्यावरून संशय निर्माण झाल्याने तसा तपास केला असता, संबंधित व्यक्ती अपघातात जखमी झाला नसून त्यास संशयित जक्कल रंगा काळे आणि त्याच्या घरातील तीन लोकांनी मारल्याचे उघडकिस आले. संबंधिताचे जक्कल काळे याच्या दुसऱ्या पत्नीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून त्याच्या डोक्यात दगड घालून जखमी केले होते. व त्यानंतर पुलाखाली आणून टाकून दुसरा संशयित मक्शा रंगा काळे याने त्याच्या मोबाईल नंबरवरून पोलिसांना फोन करून अपघाताचा खोटा बनाव तयार केला होता.

पथकाने संशयितांच्या ठावठिकाणांची माहिती काढून तीन पुरुष व एका महिलेस ताब्यात घेऊन त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी । **पान २ वर**

## उजनी धरणाने गाठली सर्वात निच्चांकी पातळी



**सोलापूर/प्रतिनिधी :** गतवर्षीच्या पावसाळ्यात पावसाने पाठ फिरवल्याने यंदाच्या उन्हाळ्यात दुष्काळाची परिस्थिती उद्धभवल्याचं दिसून येत आहे. हंडाभर पाण्यासाठी वणवण फिरणाऱ्या महिला, हाती कळशी घेऊन आईसोबत पाण्यासाठी (थरींशी) दूरदूर जाणारी लहान मुलेही पाहायला मिळत आहेत. गेल्या कित्येक वर्षानंतर पुन्हा एकदा हे चित्र पाण्याच्या नियोजनाची दाहकता दाखवून देत आहे. पाण्याअभावी धरणं तळ गाठत आहेत, शेतातील विहिरींचं पाणी आटलंय, तर बोर कोरड्या पडल्या आहेत. जनावरांच्या पाण्यासाठीही बळीराजाची भटकंती होत आहे. त्यामुळे, सर्वांनाच मान्सूनच्या आगमनाची उत्सुकत आहे. ग्रामीण भागात ८ ते १० दिवसांनी पाणीपुरवठा होत असून सोलापूरांचा घसा कोरडा पडला आहे. त्यातच पुणे आणि सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणानेही इतिहासातील सर्वात निच्चांकी पातळी गाठली आहे.

यंदाच्या भीषण दुष्काळाचे विदारक चित्र पाहायचे असेल तर उजनी धरणावर फेरफटका मारला पाहिजे. कारण, उजनी धरणाने ४४ वर्षाच्या इतिहासातील सर्वात निच्चांकी पातळी गाठली असून जेथे ५० ते १०० फूट पाणी असते, अशा ठिकाणी चक्क मोकळे मैदान झाल्याच दिसून येत आहे. उजनी धरणाची इतकी । **पान २ वर**

## १ जूनपासून होणार हे बदल, तुमच्या खिशावर थेट होणार परिणाम

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मे महिना संपत आला आहे. १ जूनपासून तुमच्या घरगुती खर्चाशी संबंधित नियमांमध्ये बदल होणार आहेत. दर महिन्याच्या एक तारखेपासून अनेक नियमात बदल होतात. जून महिन्यात एलपीजी सिलिंडर, बँक सुट्ट्या, आधार अपडेट आणि ड्रायव्हिंग लायसन्सशी संबंधित नियमांमध्ये बदल होणार आहेत. याचा थेट परिणाम सर्वसामान्यांवर होणार आहे. यामुळे तुमचे आर्थिक बजेटही बिघडू शकते.

एलपीजीची किंमत दर महिन्याच्या पहिल्या दिवशी ठरवली जाते. १ जून रोजी कंपन्या गॅस सिलिंडरच्या नवीन किमती ठरवणार आहेत. मे महिन्यात कंपन्यांनी व्यावसायिक सिलिंडरच्या किमती कमी केल्या होत्या. आता जूनमध्येही कंपन्या पुन्हा एकदा सिलिंडरच्या किमती कमी करू शकतील अशी अपेक्षा आहे. १ जून रोजीही पेट्रोल आणि डिझेलच्या दरात बदल होणार आहेत.

१ जूनपासून नवीन वाहतूक नियम लागू होणार आहे. त्यामुळे तुम्हाला आता ड्रायव्हिंग लायसन्स मिळविण्यासाठी आरटीओमध्येच परीक्षा द्यावी लागणार नाही. ड्रायव्हिंग लायसन्स मिळणे सोपे होणार आहे. कारण तुम्ही सरकार मान्य ड्राईव्हिंग सेंटरमध्ये देखील टेस्ट देऊ शकणार आहात.

नव्या नियमांनुसार आता वाहतुकीचे नियमही कडक होणार आहेत. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या लोकांना २५,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. या शिवाय परवाना देखील रद्द होऊ शकतो आणि २५ वर्षे नवीन परवाना मिळू शकणार नाही. याशिवाय इतर नियमांचे उल्लंघन केल्यास दंडाची तरतूद आहे. ज्यामध्ये वेगात गाडी चालवल्यास १००० ते २००० रुपये, विना परवाना वाहन चालवल्यास । **पान २ वर**

## जगदगरू पंचाचार्य माध्यमिक प्रशालेच्या ९५टक्के निकाल




**अक्कलकोट/प्रतिनिधी**

गौडगाव बु(ता अक्कलकोट)श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगरू पंचाचार्य माध्यमिक प्रशालेच्या फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेच्या निकाल ९५.३टक्के लागला असून कुमारी भाग्यश्री रामेश्र्वर पाटील ९२,८०टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविल्या तर कुमारी भाग्यश्री काशिनाथ मेत्रे ९१.६० टक्के गुण घेत द्वितीय तर कुमारी अक्षता काशिनाथ पाटील हिने ९०६० टक्के गुण मिळवून प्रशालेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे कन्नड माध्यमाची निकाल शंभर टक्के लागला आहे.तसेच विशेष प्राविण्य उत्तीर्ण ४३ प्रथम श्रेणी ५६द्वितीय श्रेणी उत्तीर्ण ३४यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्र्वस्त ,शिवाचार्यरत्न ,श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामीजी. संस्थेचे सर्व पदाधिकारी व मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी,ज्येष्ठ शिक्षक लाडाप्पा शिंदे व गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

## नुकसानग्रस्त पिकांची प्रांताधिकारी इथापे यांनी केली पाहणी

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर तालुक्यात गेल्या दोन दिवसांपुर्वी झालेल्या मान्सुनपुर्व पावसामुळे मोठ्या प्रमाणात



पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्र्वभूमीवर प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी तालुक्यातील अनवली,सिध्देवाडी, एकलासपूर येथील नुकसानग्रस्त पिकांची प्रत्यक्ष बांधावर पोहोचून पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.

तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पंचनामे गतीने व अचूकपणे पुर्ण करावेत. पंचनामे करताना कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार यांची दक्षता घ्यावी, अशा सूचना प्रांताधिकारी इथापे यांनी यावेळी दिल्या. यावेळी प्रांताधिकारी इथापे यांनी मौजे एकलासपूर येथील तानाजी गायकवाड व सुरेखा कोल्हे यांच्या नुकसानग्रस्त केळी पिकांची पाहणी केली. तसेच सिध्देवाडी येथील दत्तात्रय कवडे यांच्या नुकसान झालेल्या केळी व आंबा या फळबागांची त्याचबरोवर अनवली येथील वादळी वाऱ्याने कोसळलेल्या वीजेच्या टॉवरची पाहणी केली. याप्रसंगी मंडल अधिकारी बाळासाहेब मोरे, तलाठी अश्र्विनी शेंडे, कृषी सहाय्यक कैलास भोसले, ग्रामसेविका रत्नमाला बनसोडे उपस्थित होते

## सिंदखेडराजा ते शेगाव भक्ती महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या शेती अधिग्रहण करून शेतकऱ्यांना भुमीहीन करणार असल्यामुळे शेतकरी संतप्त

**बुलढाणा/राहुल साबळे**

बुलढाणा जिल्ह्यातील समृद्धी महामार्ग ते शेगाव हा शासनाने नवीन होऊ घातलेला रस्ता कितीतरी शेतकऱ्यांच्या शेती अधिग्रहण करून शेतकऱ्यांना भुमीहीन करणार असल्या मुळे शेतकरी संतप्त झाले आहे सिंदखेड राजा ते शेगाव या भक्ती महामार्ग मधील गावातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय बुलढाणा यांना ३० मे रोजी लक्षणीक उपोषण करणार असल्याची माहिती एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बुलढाणा तसेच पोलीस अधीक्षक बुलढाणा यांना एका पत्राद्वारे दिली आहे सिंदखेडराजा वरून शेगाव ला जाण्यासाठी पर्याय रस्ते असताना सुद्धा या मार्गाची गरज नसतानासुद्धा भक्ती महामार्ग शासनाने होऊ घातलेला आहे त्याला समृद्धी महामार्ग ते शेगाव या भागातील शेतकऱ्यांनी कडकडून विरोध केला आहे त्यांची काळी खासदार जमीन या मार्गात जात असल्यामुळे त्यांनी या आधी सुद्धा बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी साहेब तसेच सिंदखेड राजाचे आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे बुलडाणा चे आमदार संजय गायकवाड तसेच चिखलीचे आमदार शेवतताई महाले पाटील यांना भेटून सदर महामार्ग बाबत नाराजी व्यक्त केली होती त्यांनी सुद्धा हा महामार्ग होऊ देणार नसल्याचे तोंडी आश्र्वासन दिले होते परंतु परत एकदा एका दिवसाचे । **पान २ वर**

# संपादकीय

## कोरडी आश्वासने ..

सध्या बहुतांश भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. अशातच अनेक ठिकाणी पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले. मागील वर्षी पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे धरणं, तलावांमध्ये पाण्याचा साठा अल्पप्रमाणात राहिला आहे. तसेच उष्णतेत वाढ झाल्यामुळे विहिरी आणि बोअरवेलची पाणी पातळीदेखील खालावली आहे. काही ठिकाणी विहिरी आटल्या आहेत, तर बोअरवेल बंद पडले आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील बहुतांश भाग आता पाणीटंचाईचा सामना करत आहे. संभाजीनगरात यामुळे बांधकामांना बंदी घालण्यात आली आहे. अन्य भागातही पाणी वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये केवळ २४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दहा हजारांहून अधिक वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सरकार टँकरने पुरवठा करत आहे आणि तो करायलाच हवा, पण त्याचवेळी यामागे टँकर लॉबी आहे की काय याचाही विचार व्हावा. टँकरद्वारे दरवर्षी पाणी पुरवण्यापेक्षा पाण्याचे योग्य नियोजन आणि साठा केल्यास ही गरजच पडणार नाही. दुष्काळी गावांमध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, शेतीपंपाच्या बिलामध्ये सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर, शेतीपंपाची वीजजोडणी खंडित न करणे असे उपाय राबविले जाणे अपेक्षित आहे, पण निवडणुकीच्या धामधुमीत या प्रक्रियेला वेग आला नाही. दुष्काळापेक्षा निवडणुकांची गणिते महत्त्वाची वाटत असल्याने याबद्दल नाराजी असल्याचे स्पष्टपणे दिसते. दुसरीकडे पाणीटंचाईमुळे जनावरांच्या चाऱ्याचे दरदेखील वाढताना दिसत आहेत. कडबा, हिरवा चारा, सरकी पेंडीचे भावही वाढले आहेत. त्यामुळे जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न पशुपालकांना पडला आहे. शेतकऱ्यांच्या नावाने दुष्काळाचे फक्त राजकारण केले जाते. दुष्काळ हा राजकीय नेत्यांचा पर्यटन दौरा झाला आहे. राजकारण्यांच्या चिखलफेकीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या दूर होत नाहीत, त्यांना मदत करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ही जबाबदारी युती सरकारने झटकली आहे. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी भाजपच्या काही नेत्यांनी निवडणूक काळात कोरडी आश्वासने दिली आहेत

# श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीकडून मोडी लिपीतील पुरातन इतिहास लपवण्याचं षडयंत्र! : गणेश अंकुशराव

**पंढरपुर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सध्या भुवैकुंठ पंढरीतील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिराला पारंपरिक स्वरुप प्राप्त होण्यासाठीचे कामकाज सुरु आहे. यासाठी नवीन करण्यात आलेले विविध ठिकाणचे बांधकाम पाडले गेले तेंव्हा मंदिराच्या मुख्य सभामंडपात व बाजीराव पडसाळीत फरशीखाली मोठमोठे मोडी लिपी लिहीलेले शिलालेख बसवल्याचे समोर आले. या संपुर्ण भागात असे दगड बसवलेले होते. ते काढुन त्याठिकाणी नवीन दगड बसवण्याची गरज नसतानाही मंदिर समितीकडून हे पुरातन दगड काढुन या दगडांची तोडफोड करण्यात आली व या ठिकाणी नवीन दगड बसवण्याचा घाट घातला गेलाय. हा सर्व प्रकार पाहता या दगडावरील मोडी लिपीत असलेला पुरातन इतिहास जगापासुन दडवण्याचं षडयंत्र रचलं गेलं असल्याचा दाट संशय असल्याचा खळबळजनक खुलासा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केला आहे.

जेंव्हा या ठिकाणी हे मोडी लिपीत मजकुर कोरलले दगड आढळुन आले तेंव्हाच आम्ही मंदिर समिती व पुरातत्व खात्याकडे विनंती केली होती की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर आढळुन आलेल्या या दगडांवरील कोरलेल्या मजकुराचा अभ्यास करावा व यावर नेमके काय लिहीलेले आहे ते जाहीर करावे, परंतु याबाबत कोणतीही विचार न करता हे सर्व दगड काढुन ते तोडुन टाकण्याचं महापाप मंदिर समितीचे अधिकारी, अध्यक्ष व कांही सदस्य करत आहेत. याठिकाणी काम सुरु असताना पुरातत्व खात्याचे अधिकारी कायमस्वरुपी हजर राहणं अपेक्षीत असताना एकही अधिकारी येथे उपस्थित नसतात, बाहेरच्या राज्यातील कामगार येथे रात्रंदिवस काम करत आहेत. हे काम करताना वारकरी सांप्रदाय, पंढरपुरातील जुनी जाणकार व प्रतिष्ठीत मंडळी, समाजसेवक, राजकीय नेते यांना कोणतीही माहिती दिली जात नाही, मंदिर समितीचे अधिकारी मनाला येईल तसे काम करत आहेत. त्यामुळे हे सर्व कांही संशयास्पद वाटते.

जुने सुस्थितीत असलेले पुरातन ऐतिहासिक दगड काढुन नवीन दगड ज्या एकएका दगडाची किंमत ११०० ते १४०० पेक्षा अधिक आहे. असे दगड सभामंडप व बाजीराव पडसाळी व परिवार देवतांच्या मंदिरात बसवण्यात येत आहेत. नेमका हा अवाढव्य आणि अवाजवी खर्च का केला जातोय? ज्या दगडांवर पुरातन काळातील मोडी लिपीतील मजकुर कोरलेला होता ते अनमोल दगड काढुन त्यांची तोडफोड का करण्यात आली? हे करताना कुणाची परवानगी घेतली गेली? असे अनेक प्रश्न उपस्थित होत असुन या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. तरी तातडीने याची वरिष्ठ शासकीय पातळीवरुन चौकशी करावी आणि या षडयंत्राचा शोध लावावा. अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभे करु असा इशारा गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

फोटो ओळ :- श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरातील सभामंडप, बाजीराव पडसाळी मधील फरशीखाली आढळुन आलेल्या या दगडांवर मोडी लिपीत कोरलेला मजकुर होता, असे फरशी प्रमाणेच बसवले गेलेले हजारो प्राचीन दगड मंदिरे समितीने तोडुन टाकले आहेत.

# अखेर पंढरीतील तुळशीमाळा बनवणार्या काशीकापडी समाजाने केले स्वत:च्या समाज मंदिराचे उद्घाटन!

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

तुळशीमाळा बनवणार्या काशीकापडी समाजाने पंढरीतील काशीकापडी गल्लीतील नगरपालिकेच्या मालकीच्या परंतु विनावापर असलेल्या एका इमारतीचे काशीकापडी समाज मंदिर असे नामकरण करुन या ठिकाणी समाजाने स्वत:च पुढाकार घेत आपल्या समाजमंदिराचा उद्घाटन समारंभ केला आहे. त्यामुळे अनेक वर्षांनंतर आमच्या समाजाला विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आपले हक्काचे समाजभवन मिळाले असल्याची भावना यावेळी तुळशीमाळा कारागीर कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास उपळकर यांनी व्यक्त केली आहे.

वारकरी सांप्रदायामध्ये अनन्यसाधारण महत्व असणार्या तुळशीची माळ बनवणारा समाज म्हणून सबंध महाराष्ट्रात ओळखला जाणारा समाज म्हणजे काशीकापडी समाज. पंढरपुरातील काशीकापडी गल्ली, अनिल नगर या भागासह पंढरीच्या विविध भागात या समाजाचे वास्तव्य आहे. पिढ्यानपिढ्या वारकर्यांची सेवा निस्सिम भावनेने करणार्या या समाजासाठी अद्याप पर्यंत पंढरीत कुठेही हक्काचे समाजमंदिर नव्हते, याची मागणी बर्याच वर्षांपासुन प्रलंबित होती, अखेर आज समाजातील अनेक मंडळींनी एकत्र येत काशीकापडी गल्लीत बंद अवस्थेत असलेल्या पंढरपूर नगरपरिषदेच्या एका इमारतीवर काशीकापडी समाज मंदिर असा फलक लाऊन त्याचे उद्घाटन केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार व कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्याकडे काशीकापडी समाजाच्या समाज मंदिरासह विविध मागण्यांचे निवेदन दिले होते, शासकीय स्तरावर समाज मंदिरासाठी पाठपुरावा सुरु होता, परंतु आमच्या समाजाच्या मागणीचा विचार झाला नाही, अखेर आज समाजातील प्रतिष्ठीत मंडळी, तरुण यांनी एकत्रीतपणे आमच्या काशीकापडी गल्लीतील नगरपालिकेची ही वापरात नसलेली इमारत समाजमंदिर म्हणुन वापरण्याचा निर्णय घेतला असुन त्याचे समाजमंदिर म्हणून रीतसर उद्घाटन झाले आहे. यापुढे या वास्तुचा वापर समाजाच्या विविध सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी करणार आहोत. अशी माहिती यावेळी श्रीनिवास उपळकर यांनी दिली आहे.

यावेळी समाजसेवक गणेश भिंगारे, दत्तात्रय वाडेकर, भारत टमटम, योगेश टमटम, सागर कुंदूर, शुभम उपळकर, विनायक पिंगळे, सागर उपळकर, कपिल कापसे, मनोज पिंगळे, सुरज भिंगारे, प्रथम भिंगारे, प्रथमेश उपळकर, आदी समाज बांधव उपस्थित होते.

पान १ वरुन

## जिल्ह्यात रेशीमच्या उत्पादन वाढीसाठी

सविस्तर मार्गदर्शन करावे. यासाठी शेतकऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा, तालुका व गाव पातळीवर आयोजित करावे. रेशीम उत्पादनातील तज्ञ मान्यवर यांच्यासह प्रत्यक्ष रेशीम शेती करून उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे मार्गदर्शनही कार्यशाळेत द्यावे. रेशीम शेतीचे चांगले उत्पादन घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना रेशीम शेती योजनेअंतर्गत सर्व संबंधित बँकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कर्ज प्रकरणे त्वरित मंजूर करावेत अशा सूचनाही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यावेळी दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी जिल्ह्यात रेशीम शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभवणाऱ्या जिल्हा रेशीम कार्यालय, कृषी विभाग, रोजगार हमी विभाग, आत्मा या योजनेसाठी कर्ज पुरवठा करणाऱ्या बँका, जिल्हा ग्रामोद्योग, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक ग्रामीण रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देणारी संस्था तसेच रेशीम उत्पादन घेणाऱ्या काही शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन सोलापूर जिल्ह्याला रेशीम उत्पादनात अग्रेसर करण्यासाठी कृती आराखडा करून त्यानुसार पुढील काळात कामकाज करावे असे निर्देशही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

प्रारंभी जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्री. पवार यांनी जिल्ह्यात सद्यस्थितीत रेशीम शेतीची माहिती बैठकीत सादर केली. सन २०१९-२० मध्ये ३०० एकर रेशीम शेतीचे उद्दिष्ट असताना ५०७ एकर, सन २०२०- २१ मध्ये ३०० एकरचे उद्दिष्ट असताना ५६७, सन २०२१-२२ मध्ये ५३० एकर, सन २०२२-२३ मध्ये ३५० एकर उद्दिष्ट असताना ६५३ एकर, सन २०२३ -२४ मध्ये २५० एकरचे उद्दिष्ट असताना १ हजार ९ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आलेली आहे. तसेच जिल्ह्यातील उत्तर व दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट व माळशिरस या तालुक्यात तुती लागवडीसाठी अधिक प्राधान्य दिले जात आहे अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी रोजगार हमी योजना, कृषी विभाग व आत्मा या विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाच्या वतीने रेशीम शेती करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपायोजनांची माहिती सादर केली.

जिल्ह्यात रेशीम उद्योग वाढीसाठी जिल्हाधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे सर्व संबंधित विभागाच्या प्रमुखांना तसेच रेशीम चांगले उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय समितीची स्थापना लवकरच होऊन समितीचे कामकाज सुरू होणार आहे.

## १ जूनपासून होणार हे बदल

५०० रुपये, हेल्मेट न घातल्यास १०० रुपये आणि सीट बेल्ट न लावल्यास १०० रुपये दंड आकारला जाईल. युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया म्हणजेच णखऊ-ख नुसार, जर तुम्ही तुमचे आधार कार्ड (-रवहरी लरीव 'र्विरींश पश्रळपश) १० वर्षांपासून अपडेट केले नसेल, तर तुम्ही १४ जूनपर्यंत तुमचे आधार कार्ड मोफत अपडेट करू शकता. णखऊ-ख पोर्टलवर आधार कार्ड ऑनलाईन अपडेट करण्याची सुविधा मोफत दिली जात आहे. मात्र, १४ जूननंतर तुम्हाला या कामासाठी पैसे द्यावे लागतील. तुम्ही हे काम आधार केंद्राला भेट देऊन देखील करू शकता. तुम्ही तुमचे आधार कार्ड अपडेट करण्यासाठी आधार केंद्रावर गेल्यास तुम्हाला ५० रुपये शुल्क भरावे लागेल. तर णखऊ-ख पोर्टलवर कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही.

जून महिन्यात बकरी ईद, वट सावित्री पोर्णिमा यासह विविध सण आणि साप्ताहिक सुट्ट्यांमुळे अनेक दिवस बँका बंद राहणार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (ठइख) च्या अधिकृत वेबसाइटवर दिलेल्या माहितीनुसार, लोकसभा निवडणुकीच्या (लोकसभा) सातव्या टप्प्यात एकूण १२ दिवस बँकांना सुट्ट्या असतील. देशात १ जून रोजी बँकांना सुट्टी असेल. बँका बंद राहतील, या काळात तुम्ही बँकिंगशी संबंधित कोणतेही काम करू शकणार नाही. त्यामुळे बँकेशी संबंधित महत्त्वाची कामे आधीच करून घ्यावीत.

## सिंदखेडराजा ते शेगाव भक्ती

लक्षणीक उपोषण करून सदर महामार्ग होऊ नये म्हणून सर्व शेतकरी एका दिवसाचे लक्षणीक उपोषण करणार आहे सदर निवेदनावर समाधान मस्के मधुकर सपकाळ गणेश वाघ सुनील अंभोरे संजय मस्के गणेश रामभाऊ वाघ समाधान मधुकर मस्के सुनील वसंतराव अंभोरे संजय दामोदर मस्के व इतर अनेक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत

## अपघाताचा बनाव करून खून

गुन्हा केल्याचे कबूल केल्याने त्यांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. संशयित जक्कल रंगा काळे याच्यावर २८ गंभीर गुन्हे दाखल असून अट्टल गुन्हेगारांकडून खुनासारखा गंभीर गुन्हा उघड केल्याबद्दल कारवाईमध्ये सहभागी अधिकारी व अंमलदारांचे पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक तसेच वाईच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.या कारवाईत पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, वाईचे उपविभागीय पोलीस अधिकारी बाळासाहेब भालचिम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली भुईंज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विशाल भंडारे, पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला.

## उजनी धरणाने गाठली..

कोरडी अवस्था यापूर्वी कधीच पाहायला मिळाली नव्हती, तेवढी यंदाच्या मे महिन्यात दिसत आहे. यापूर्वी ३० जून २०१९ रोजी उजनी धरण वजा ५९.०५ टक्के इतक्या निच्चांकी पातळीला गेले होते. त्यानंतर पाच वर्षात ही नीचांकी पातळी एक महिना आधीच ओलांडत उजनी धरणाने थेट वजा ५९.३० टक्के एवढी निच्चांकी पातळी गाठली आहे. त्यामुळे उजनी धरणावरील सर्व यंत्रणा बंद पडल्या असून धरणात आता केवळ वजा ३१ टीएमसी एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे.

# शारदा विद्यालयातील तब्बल ४० वर्षानंतर माजी विद्यार्थी एकत्र

**भिवंडी/मिलिंद जाधव**




वडिलांनंतर संस्काराची शिदोरी आणि उज्वल भविष्याची वाट दाखवणारी असते. ज्या शाळेत आपण शिकलो, मोठे झालो ती शाळा आणि त्या शाळेच्या आठवणी आयुष्यात कधीही विसरल्या जात नाहीत. याच ऋणानुबंधातूनभिवंडी तालुक्यातील पडघा, शारदा विद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देत १९८४- ८५ च्या दहावी च्या बॅच तर्फे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने तब्बल ४० वर्षानंतर सर्व मित्रपरिवार एकत्र आला होता. यावेळी मित्रपरिवारातून निघून गेलेल्या मित्रमित्रमैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी बालपणीच्या आठवणीत रमलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुललेले दिसत होते. उपस्थित सर्वांचा यथोचित सन्मान करण्यात आला.त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपला वैयक्तिक परिचय करून दिला.अनेकांनी आपल्या शैलीत गाणे म्हणत तर विविध कला सादर करीत जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यामधील अनेक माजी विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत. सदर स्नेहसंमेलनासाठी डॉ. संजय पाटील, अभय नागावेकर संजय मेस्त्री यांनी विशेष पुढाकार घेतला. सर्वांनी एकत्रित स्नेहभोजन करत पुन्हा भेटू या असे सांगून निरोप घेतला.

## प्रेम म्हणजे तुझा मेसेज

प्रेम म्हणजे तुझा फोन
प्रेम म्हणजे मी धावत येणं
प्रेम म्हणजे मला बोलावणे
प्रेम म्हणजे तुझा आवाज
प्रेम म्हणजे तुझ हसण
प्रेम म्हणजे माझ रुसन
प्रेम म्हणजे तिथे तुझ असव ... ...
प्रेम म्हणजे गेल ना
प्रेम म्हणजे काय बोलू
प्रेम म्हणजे काही पण
प्रेम म्हणजे एकमेकांसाठी आपण...
प्रेम म्हणजे माझे प्रश्न
प्रेम म्हणजे तुझ उत्तर असण
प्रेम म्हणजे तुझ असच पाहण
प्रेम म्हणजे माझ हळुवार लाजण

**नीलिमा साळुंखे, मुंबई**

## मोहोळ तालुक्यात मानसून पूर्व झालेल्या पावसामुळे तसेच वादळी वाऱ्यामुळे मोहोळ तालुक्यातील झालेल्या नुकसानीची माहिती: तहसीलदार सचिन मुळीक

**पंढरपूर/प्रतिनिधी**

वादळी वारे पाऊस वीज पडून झाड पडून नुकसान झाल्याबाबत उपरोक्त विषयाचे सादर करण्यास तलाठी यांचे प्राथमिक स्वरूपाची अहवालानुसार दिनांक २६/५/२०२४ रोही वादळी वारे पाऊस वीज पडून. झाडे पडून झालेली पिक व जीवित वित्त आणि बाबतची माहिती खालील प्रमाणे

१) शेतीचे नुकसान: शेतकरी संख्या १४५ क्षेत्र - १७०,०० हेक्टर

२) घर परधड अंशतः ७५ पूर्ण- ०२

३) वीज पडून मयत व्यक्ती-००

४) भिंत पडून मयत व्यक्ती-०१ व जखमी व्यक्ती ०५

५) वीज पडून मयत पशुधन: मोठे ०१ व लहान ००: व शेळी ०१

६) व झाडे पडून मयत पशुधन; मोठे ०५ लहान ००

७) झाड पडून जखमी पशुधन: मोठे ०९ व लहान ००

माहितीस्तव सविनोद सादर

प्रत मा. उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग यांच्याकडे माहितीस्तव संविधान सादर




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मनुस्मृतीचे समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सम्यक विद्यार्थी आंदोलनाचा विरोध



मनुस्मृतीचे समर्थन करणारा अभ्यासक्रम आराखडा जाहीर केलेला आहे. त्याचा निषेध व त्या विरोधात आज दिनांक २८ मे

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने अक्कलकोट तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महेश भारतीय सर यांच्या सूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्रात सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने जिल्हा अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, यांनी २०२४ मंगळवार रोजी राज्यभर सम्यक विद्यार्थी आंदोलना तर्फे कलेक्टर यांना निवेदन देण्यात आले, त्या आनुषंगाने आज सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने अक्कलकोट तहसील कार्यालय मार्फत निवेदन देवुन निषेध व्यक्त केला यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रवक्ता रविराज पोटे, गंगाराम वाघमारे, साहिल कांबळे, अनिल गायकवाड, आकाश हरवाळकर, आदी सह विद्यार्थी उपस्थित होते

# पाणी नाही नळाला ग्रामपंचायत कशाला ?

✻ नियोजन शून्य कारभारामुळे पाण्यासाठी काँग्रेस च्या वतीने उपोषण सुरुच. ✻ सत्ताधारी आपल्याच धुंदीत पाणी पाजण्याच्या पण लायकीचे नाहीत का ? असा जनतेच्या मनात संभ्रम.

**✻ आमरण उपोषणाच्या प्रमुख मागण्या**
**दुसरबीड शहराला नियमित नळाद्वारे पाणी मिळणे**
**फोडलेले सिमेंट रस्ते लवकरात लवकर पूर्ववत करणे**
**पावसाळा आल्यामुळे शहरातील नाल्या साफसफाई करणे**

**बुलढाणा/राहुल साबळे**

सिंदखेड राजा तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत दुसरबिडची आहे या. ग्राम पंचायत ला चार ठिकाणाहून पाण्याची व्यवस्था आहे पण ग्राम पंचायत चा नियोजन शुन्य कारभारामुळे गावात भिषण पाणीटंचाई ला समोर जावे लागते हि लाजीर वाणी बाब आहे संपूर्ण उन्हाळ्यात तापमान ४३ओ डिग्री च्या वर गेलेले असुनही फक्त पाण्यासाठी दुसरबीडकरांची पायपीट सातत्याने होत आहे.घरातील लहान लेकरांपासुन ते महिला, पुरुष हे पिण्याच्या पाण्याच्या शोधात असतात एकीकडे पंतप्रधान मोदी व देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रामध्ये व देशांमध्ये जल जीवन मिशनचे छाती झोडून डंका वाजवत फिरत आहेत. परंतु दुसर बीड सारख्या सिंदखेडराजा तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतला पिण्याचे पाण्याचे तसेच वापरण्याच्या पाण्याचे नियोजन करता येत नाही हे ग्राम प्रशासनाचे तसेच जिल्हा प्रशासनाचे मोठे अपयश आहे हे यावरून दिसत आहे .

गेल्या महिन्याभरापासून पाण्यासाठी झंजावत निघत आहे परंतु प्रशासन सामान्य जनतेला काहीही मानत नाही यावरून हे दिसून येत आहे परंतु या देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी आंदोलन व उपोषण करून मिळालेला आहे तर आपल्याला फक्त शांततेच्या मार्गाने आमरण उपोषण करून दुसरबीड वासियांना पाणी कसे मिळेल हे प्रयत्न करायचे आहे.व अनेक मागण्या घेऊन काँग्रेसचे नेते जुनेद अली व काँग्रेसचे गजु जायभाये रहेमान भाई.सुनील जायभाये शहेदा




पठाण हलीम खा पठाण अर्जुन घुगे पांडुरंग वाघ पदाधिकारी व पाण्यासाठी त्रस्त असलेले गावकरी आता आमरण उपोषणाला बसले आहेत.तरी सुद्धा प्रशासनाने दखल घ्यावी

# जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनी सॅनिटरी नॅपकिन वापराचा व वैयक्तिक स्वच्छतेचा मुलींनी केला निर्धार

**सोलापूर/प्रतिनिधी:**

जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानगर शेळगी येथील ज्ञानपीठ कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थिनींकरिता मासिक पाळी स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिन वापराचे महत्व, हिमोग्लोबिन या विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ चे चेअरमन रोहित राठी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी सोलापूर हायफ्लायर्सचे सचिव अभिजित मालाणी, सत्यम सुपर मार्केटचे मालक रामेश्र्वर करवा, ज्ञानपीठ कोचिंग क्लासेसचे प्रा. डॉ. अनमोल वळसंगे, प्रा. हांडगे सर, प्रा. लक्ष्मीकांत कोरे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, समुपदेशिका कल्पना गडगडे, मनीषा चव्हाण उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानपीठ कोचिंग क्लासेसचे प्रा. डॉ. सचिन साखरे हे होते.फॅमिली प्लॅनिंगच्या समुपदेशिका कल्पना गडगडे व मनीषा चव्हाण यांनी किशोरवयीन मुलींना २८ मे हा जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस म्हणून का साजरा केला जातो, मासिक पाळी स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिन वापराचे महत्व, हिमोग्लोबिन या विषयावर मार्गदर्शन केले. प्रबोधन शिबिरानंतर लॅब टेक्निशियन व्यंकटेश कंची यांनी मुलींची हिमोग्लोबिन तपासणी केली.



ज्ञानपीठ कोचिंग क्लासेसच्या १० वी आणि १२ च्या वर्गातील १५५ मुलींचा या कार्यक्रमात सहभाग होता. या वेळी मुलींनी सॅनिटरी नॅपकिन उंचावून - सॅनिटरी नॅपकिन वापराचा व वैयक्तिक स्वच्छतेचा निर्धार केला. सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ च्या वतीने मुलींना २०० सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. शेवटी प्रा. डॉ. सचिन साखरे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाचे स्वागत अभिजित मालाणी यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले.

# अभिनेत्री कंगणा राणावत मंडी लोकसभा क्षेत्राचा आवाज संसदेत बुलंद करतील : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मंडी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बॉलिवुडची लोकप्रिय अभिनेत्री कंगणा राणावत ही अभिनय कलेने देशभरात लोकप्रिय आहे.अभिनया सोबत तिला समाजसेवेची मनस्वी आवड आहे.राजकारणाची;समाजकारणाची आवड आणि अभ्यास आहे. कंगणा राणावतला गरिबांच्या प्रश्र्नांची जाणीव आहे.हिमाचल ची कन्या म्हणून अभिनेत्री कंगणा रणावत मंडी लोकसभा क्षेत्रातील जनतेचा संसदेत आवाज बुलंद करतील.त्यामुळे मंडीतील जनतेने बहुगुणी अभिनेत्री कंगणा राणावत ला बहुमताने खासदार म्हणुन निवडून द्यावे.असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मंडी येथील गोमटा गोपालपुर येथे आयोजित जाहिर प्रचार सभेत केले.यावेळी मंचावर मंडी लोकसभा क्षेत्राच्या भाजपच्या उमेदवार कंगणा राणावत आणि भाजप रिपाइं चे अनेक मान्यवर उपस्थित होते.



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे २ दिवसीय हिमाचल प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत.आज त्यांनी हमिरपुर लोकसभा मतदार संघाचे भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर आणि मंडी लोकसभा मतदार संघाच्या भाजप च्या उमेदवार कंगणा राणावत यांचा प्रचार केला.या दौऱ्यात आज त्यांनी जाहिर प्रचार सभांना संबोधित केले,पदयात्रा केल्या.मंडी मधील जाहुर या गावात अभिनेत्री कंगणा राणावत चे वडील अमरदिप राणावत यांनी ना.रामदास आठवले यांचे स्वागत केले. जो चाहिए वो मांगना,क्योंकी चुनकर आएगी कंगणा अशी कविता सादर करुन ना.रामदास आठवले यांनी केलेल्या भाषणाला येथील जनतेने उदंड प्रतिसाद दिला.

ज्यांच्यावर कसला ही नाही डाग ते निवडुण येणार आहेत ठाकुर अनुराग असे काव्यमय आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.मंडी आणि हमिरपुर मधील जनतेने ना.रामदास आठवले यांचे काव्यमय शैलीतील भाषण ऐकण्यास मोठी गर्दी केली होती.कंगणा राणावत यांच्या प्रचारात ना.रामदास आठवले यांच्या चारोळी कवितांनी रंगत आणली.

काँग्रेसने त्यांच्या सत्ता काळात देशाचा विकास खुंटवला.गरिबी हटावचा नारा देऊन गरिबी हटवली नाही.मात्र काँग्रेसने गरिबांना हटवण्याचे काम केले.त्यामुळे देशाचा विकास करण्यासाठी नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा प्रधानमंत्री बनविले पाहिजे.नरेंद्र मोदींना प्रधानमंत्री बनवण्यासाठी अनुराग ठाकुर आणि कंगणा राणावत यांना निवडुन देण्याचे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.

# स्वेरीमध्ये 'डिझाईन थिंकिंग, क्रीटीकल थिंकिंग अॅड इनोव्हेशन डिझाइन' या विषयावर कार्यशाळा संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विभागांतर्गत असलेल्या 'इसा' अर्थात इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंटस् असोशिएशन आणि इन्स्टिटयूशन्स इनोव्हेशन कौन्सिल यांच्या तर्फे 'डिझाईन थिंकिंग, क्रीटीकल थिंकिंग अँड इनोव्हेशन डिझाइन' या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

दीप प्रज्वलनानंतर इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.डी.ए.तंबोळी यांनी प्रास्तविकात ही कार्यशाळा आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेलचे समन्वयक डॉ. एस. एस. वांगीकर यांनी 'सस्टेनेबल इनोव्हेशन' याबद्धल माहिती दिली. दुसऱ्या सत्रात इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.डी.ए.तंबोळी यांनी 'टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इन प्रॉडक्ट डेव्हलपमेंट' याबद्दल मार्गदर्शन केले तर तिसऱ्या सत्रात प्रा.एस.व्ही.मोहोळकर यांनी 'आयडिया जनरेशन अँड स्क्रीनिंग' या विषयावर माहिती सांगितली. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एम.एम. पवार यांनी 'इंट्रोडक्शन टू डिझाईन थिंकिंग अँड क्रिटिकल थिंकिंग' या संकल्पना स्पष्ट केल्या तर दुसऱ्या सत्रात एमबीएचे विभागप्रमुख प्रा.के. बी. पाटील यांनी 'ब्लूमिंग इन स्टार्टअप इको सिस्टम' याबाबत मार्गदर्शन करत भविष्यात स्टार्टअप करताना कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या हे स्पष्ट केले. तिसऱ्या सत्रात प्रा.व्ही.ए.सावंत यांनी 'एम्पथी मॅपिंग' यावर विचार व्यक्त केले. तिसऱ्या दिवशीच्या पहिला सत्रात संशोधन अधिष्ठाता डॉ. ए.पी.केने यांनी इव्होल्युशन, डिझाईन थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग अँड इनोव्हेशन थ्रू रिसर्च वर्क' या विषयावर मार्गदर्शन केले तर दुसऱ्या सत्रात प्रा.पी.बी. रोंगे यांनी 'इंटरप्रेनरशीप डेव्हलपमेंट' याबाबत सविस्तर माहिती दिली तर त्यांनीच तिसऱ्या सत्रात 'केस स्टडीज अँड प्रॉब्लेम सॉलव्हींग बेस्ड ऑन इंटरप्रेनरशीप' या विषयी विचार व्यक्त केले. चौथ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ.डी. ए. तंबोळी यांनी 'अनलॉकिंग बिझनेस सक्सेस' यावर मार्गदर्शन करत विविध संकल्पना स्पष्ट केल्या. दुसऱ्या सत्रात डॉ.एस. एस. गिल्डा यांनी 'लिगल लेअर: अंडरस्टँडिंग ट्रेडमार्क्स पेटंट अँड कॉर्पोरेट' यावर सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे निरसन केले. तिसऱ्या सत्रात डॉ. डी.ए.तंबोळी यांनी 'फिटिंग आयडिया इन टू लिन कॅनव्हास मॉडेल' यावर मार्गदर्शन केले. पाचव्या दिवशी डॉ.एम.पी.ठाकरे यांनी सलग तीन सत्रात दिलेल्या मार्गदर्शनात 'मॅपिंग इनोव्हेशन थ्रू टीआरएल, एमआरएल, आयआरएल', 'युक्ती' च्या माध्यमातून आयडिया तयार कशा कराव्यात? तसेच 'शोकेसिंग आयडिया थ्रू इफेक्टिव्ह प्रेझेंटेशन' यावर विचार व्यक्त केले. अशा रीतीने ही पाच दिवसीय कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली. यामध्ये इलेकट्रीकल इंजिनिअरिंग विभागातील १३ प्राध्यापक व ६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




# मोबाईल चोरून पळून जाणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी पाठलाग करून पकडले..




**बुलढाणा/राहुल साबळे**

२७ मे रोजी चिखली येथील आठवडी बाजार असल्याने साकेगाव येथील सुरेश विजयसिंग परिहार हे सायंकाळी ५:३० वाजता चिखली शहरातील पारधी बाबा रोड वरील भाजीपाल्याच्या दुकानात भाजीपाला घेण्यासाठी खाली वाकले असता त्यांच्या पँटच्या मागील खिशात ठेवलेला रिअल मी एक्स कंपनीचा मोबाईल एक इसम गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या खिशातून काढून घेऊन डी पी रोडकडे पळत जात असताना सुरेश परीहार हे त्याच्या मागे पळत गेले, डी पी रोडवर ड्युटीवर तैनात असलेल्या पोलिसांना सदर चोरटा इसम पळत असतांना लक्ष्मी मार्केट मध्ये पोलिसांनी त्या चोरट्यास पटलाग करून पकडले.

त्यानंतर सुरेश परीहार यांनी पोलिसांना सांगितले की सदर ह्या इसमाने माझा मोबाईल चोरला आहे, त्यावर त्या इसमाची पोलिसांनी झडती घेतली असता त्या इसमा जवळ सुरेश परीहार यांच्या व्यतिरिक्त आणखी ५ मोबाईल मिळून आले. सदर त्या इसमाची कसून विचारपूस केली असता त्याने अब्बास याकूब पटेल, ( वय ४२ वर्ष रा. कावी, ता. जंबसुर, जि. भरुच, गुजरात ) असे सांगितले. सुरेश परीहार यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चोरट्या ईसमा विरूद्ध अप क्र ४०४/२४ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदर या गुन्ह्याच्या संबंधाने पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांनी पोलीस स्टेशनचे डी बी पथक प्रमुख यांना गुन्हा संदर्भाने सखोल तपास करून अजून आरोपी आहेत का बाबत सूचना दिल्या वरून डीबी पथकाचे इंचार्ज पोऊनी नितीनसिंह चव्हाण, पोना अमोल गवई, पोकॉ रोहिदास पंढरे, पंढरीनाथ मिसाळ, सागर कोल्हे, राहुल पायघन, निलेश सावळे यांनी आरोपी अब्बास याकूब पटेल याची सखील विचारपूस केली असता त्याने सांगीतले की, देऊळघाट ता. जि. बुलढाणा येथील शेख मोइन यानेच मला चिखलीच्या बाजारामध्ये मोबाईल चोरी करण्यासाठी आणले होते. या त्याच्या सांगण्यावरून शेख मोईन याचा शोध घेण्यासाठी बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील देउळघाट येथे जाऊन सदर आरोपीस मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन सदर गुन्ह्याबद्दल विचारपूस केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिल्याने आरोपी १) अब्बास याकूब पटेल ( वय. ४२ वर्ष, रा. कावि ता. जंबसुर, जि. भरूच गुजरात ), २)

शेख मोईन शेख मुकीम ( रा. सय्यद मोहल्ला, देउळघाट, ता. जि. बुलढाणा ) या दोन आरोपींच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीचे ६ मोबाईल एकूण किंमत ६४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून या दोन्हीही आरोपींना अटक केली.सदरची कारवाई हि पोलीस अधीक्षक बुलढाणा, अप्पर पोलीस अधीक्षक बुलढाणा, उपविभागीय पोलिस अधिकारी बुलढाणा यांचे मारगदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संग्राम पाटील, डीबी पथकाचे ईंचार्ज पोऊनी नितीनसिंह चव्हाण, पोना अमोल गवई, पोकॉ राजेश मापारी, पंढरीनाथ मिसाळ, रोहिदास पंढरे, सागर कोल्हे, राहुल पायघन, निलेश साबळे, मपो कॉ रुपाली उगले, मपोहेकॉ माया सोनोने यांनी केली.

# मोबाईल चोरांवर मोठी कारवाई पाच लाखाचे मोबाईल जप्त



**पंढरपूर/प्रतिनिधी**

गेल्या वर्षी सुद्धा आषाढी वारीमध्ये मोबाईल चोरीला गेले होते त्याची पंढरपूर शहर मध्ये पोलिसांमध्ये तक्रार आलेली होती पोलिसांनी त्याचा तपास सुरू केला होता अखेर दहा महिन्यानंतर त्या मोबाईलचा तपास लागलेला आहे पोलिसांना यश आले आहे दोन मोबाईल चोरट्यांना त्यांनी अटक केली आहे

त्यांच्याकडून बारा हजार रुपये किमतीचे ६२ मोबाईल चोरटे सापडल्यामुळे भाविक भक्ताकडून समाधान व्यक्त होत आहे. गेले आषाढी यात्रेमध्ये दहा लाखाहून अधिक भाविक पंढरपूरमध्ये दाखल झाले होते विठ्ठल मंदिर परिसर प्रदर्शना मार्ग वफासेटेकर परिसरात मोठ्या प्रमाणात मोबाईलची चोरी झालेली होती चोरी झालेल्या भाविकांनी पंढरपूर शहरांमध्ये शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल केल्या होत्या याची दखल घेऊन पोलिसांनी चोरट्यावर करडी नजर ठेवून त्याचा तपास अनेक महिन्यापासून चोरटे पोलिसांना चकवा देत होते दहा महिन्यानंतर मोबाईल विक्री करताना चोरट्यांना रंगेहात पकडण्यास पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी एका मोबाईल चोरास त्यांनी पकडले सापळा रचून आणि त्याला शहर पोलीस स्टेशनमध्ये आणून त्याच्यापासून चौकशी केली असता त्यांनी यात्रा कालावधीमध्ये त्यांच्या सहकार्याच्या मदतीने मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली पोलिसांनी चोरट्याला ना विचारले असता धर्मराज सावंत आंबेडकर नगर पंढरपूर असे सांगितले व त्याचा साथीदार अमीर शिंदे पारधी वस्ती टाकळी असे त्याचे नाव आहे त्यांच्या मदतीने चोरी केली असल्याचे सांगितले त्यांची कसं चौकशी करून ६२ मोबाईल त्यांच्याकडून जप्त केले व त्याची किंमत पाच लाख १२ हजार रुपये आहेही कारवाई उपविभागीय अधिकारी ड्रॉ अर्जुन भोसले पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश भुजबळ हेड कॉन्स्टेबल सुरज हेंबाडे प्रसाद आवटी सुनील बनसोडे शरद कदम सचिन हेंबाडे शहाजी म्हणले यांनी केले आषाढी वात्रे अगोदर होणारी कारवाई मुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे

# मुंबई महापालिका निवडणुकीत सर्व जाती-धर्मीयांना उमेदवारी देऊन रिपब्लिकन पक्षाची एकजातीय प्रतिमा पुसणार : केंद्रीय राज्यमंत्री आठवले

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने महायुतीचा प्रामाणिक प्रचार केला.मुंबईत महायुतीच्या उमेदवारांना रिपब्लिकन पक्षाने प्रामाणिक पणे साथ दिली आहे.प्रचंड मेहनत करुन महायुतीच्या उमेदवाचा प्रचार केला आहे.महायुतीच्या एकजुटीमुळे मुंबईत सर्व ६जागांवर महायुतीचा विजय होईल हे निश्रि्चत आहे.महायुतीच्या होणाऱ्या विजयात रिपब्लिकन पक्षाचा सिंहाचा वाटा आहे.असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पेंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.अंधेरी येथे कर्मविर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रात रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशची आढावा बैठक घेण्यात आली.यावेळी ना.रामदास आठवले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.




आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्ष राज्यात १० जागांची मागणी करणार असुन त्यापैकी मुंबईत विधानसभेच्या २ जागा रिपब्लिकन पक्ष लढविणार आहे.आगामी मुंबई महापालिका निवडणूकीत रिपब्लिकन पक्ष २० जागांवर उमेदवार उभे करणार आहे.महापालिका निवडणुकीत दलितान सोबत मुस्लिम,मराठा,गुजराती भाषीक उत्तर भारतीय अशा विविध जाती धर्माच्या उमेदवारांना रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी देऊन रिपब्लिकन पक्षाची एकजातीय प्रतिमा पुसण्याचा प्रयत्न करणार आहोत.

बौध्द,मातंग,दलितांमधील जाती,ओबीसी आणि मुस्लिमां सह जातीची समिकरणे जुळवून मुंबई महापालिकेत रिपब्लिकन पक्षाचे नगरसेवक निवडून आणण्याचा आमचा प्रयत्न राहिल.असे ना.रामदास आठवले म्हणाले.रिपब्लिकन पक्षात मातंग आघाडी,अल्पसंख्याक आघाडी,मराठा आघाडी,गुजराती भाषीक आघाडी अशा विविध आघाड्या असल्या तर अन्य पक्ष रिपब्लिकन पक्षाला िकाच जातीचा पक्ष मानतात. रिपब्लिकन पक्षाची ही एकजातीय प्रतिमा पुसण्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी सर्वजाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.लोकसभा निवडणुकीत ज्या रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महायुतीच्या विरुध्द काम केले पक्षात शिस्त भंग केला त्या कार्यकर्त्यांना पक्षातुन निलंबित करावे असे आदेश ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिले.

यावेळी सौ.सिमाताई आठवले,राज्य सरचिटणीस गौतम सोनावणे,अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,महिला आघाडीच्या उषाताई रामलु,ॲड.अभया सोनवणे,वंदना मेहता,विवेक पवार,सुरेश बारसिंग,एम.एस.नंदा,राय बहादुर,घनश्याम चिरणकर, जिल्हा अध्यक्ष प्रकाश कमळाकर जाधव,अजित रणदिवे,संजय डोळसे,रमेश गायकवाड,साधु कटके तसेच चंद्रकांत पाटील,सुनिल बन्सी मोरे,युवक आघाडी चे मुंबई अध्यक्ष सचिनभाई मोहिते, जयंतीभाई गडा, राशिद अन्सारी, रेश्मा खान , रत्ना ताई शिंदे ,सुनील पवार, रमेश पाईकराव, राजाभाऊ गांगुर्डे, सुनील गमरे,विजय वाघमारे, संजय खंडागले, रवी गायकवाड, श्रीमंत तोरणे, विजय वंजारी, अनिस पठाण, दादू भोसले, रतन अस्वारे, योगेश शिळवंत , आदि अनेक मान्यवर उपस्थित होते.

# माता रमाईचे अप्रकाशित साहित्य बार्टी प्रकाशित करणार : सुनिल वारे

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा संघर्ष त्यागमय असून डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभे राहिल्या ,रमाईच्या संघर्षमय आठवणी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांनी दिलेली खंबीरपणे साथ , त्यांचा पत्रव्यवहार, त्यांच्या जीवनावरील ऐतिहासिक घटनांचे संशोधन करून त्यांचे अप्रकाशित साहित्य बार्टी प्रकाशित करणार असे बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी जाहीर केले .

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक २७ मे २०२४ रोजी त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर आणि देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी रमाईच्या त्यागावरच डॉ बाबासाहेब आंबेडकर या महासूर्याचं वादळ उभे राहिले ,असे प्रतिपादन केले.रमाईच्या जिवनातील ऐतिहासिक घटनांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशन व प्रसिद्धी विभागामार्फत प्रकाशित करणार आहेत यासाठी रमाईच्या जिवनातील अनेक गोष्टींचे संशोधन करून पुढील कार्य करण्यात येईल तसेच बार्टीमार्फत सामाजिक न्याय विभागाच्या वतीने नियामक मंडळाच्या मान्यतेने भीमराव ते बाबासाहेब हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची वेब सिरिज लवकरच सुरू करणार असल्याचे सांगून त्यागमूर्ती रमाईस हा प्रकल्प अर्पण करत असल्याचे सांगितले. ग्रंथपाल श्रीमती वैशाली खांडेकर यांनीही रमाईच्या स्मृतीना उजाळा दिला.

यावेळी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, अनिल कारंडे, संजय कदम यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नेस वाडिया कॉलेज समोरील महामाता रमाबाई भिमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथील रमाईच्या पुतळयास मा महासंचालक श्री सुनिल वारे, विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

माता रमाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने निमंत्रक विठलदादा गायकवाड यांनी श्री वारे, डॉ चव्हाण यांना शांतीचे प्रतीक पंचशीलेची शाल, सन्मान चिन्ह , रमाईचे जीवन चरित्र भेट देऊन सन्मानित केले.यावेळी मा महासंचालक, मा विभागप्रमुख यांनी विठ्ठलराव गायकवाड व मान्यवरांसमवेत रमाईच्या संघर्षमय जीवनातील पैलुवर चर्चा केली. याप्रसंगी आर के लोढे, बार्टीचे सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड, रामदास लोखंडे, आदी उपस्थित होते.

# एकदातरी हजला जाण्याची प्रत्येक मुस्लिम धर्मीयाची इच्छा

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

एकदातरी हजला जाण्याची प्रत्येक मुस्लिम धर्मीयाची इच्छा असते. तुम्ही सुदैवी आहात की याचे सौभाग्य तुम्हा सगळ्यांना मिळत आहे. पुण्यकर्म करण्यासाठी हजला निघालेल्या यात्रेकरूंना शुभेच्छा देणे हेही पुण्यकर्मच आहे

**कुंटुंबातील सर्व जबाबदारी संपल्यावर हजला जातात. तेथे दर्शन, नमाज , तवाफ (प्रदिक्षिणा) घातले जाते. जे जन्मताना लब्बैक म्हणतो तोच हजला जाऊ शकतो. अरकाम (पुर्ण हज) यात्रेसाठी चाळीस दिवस लागतात. तेथे नमाज, कुरान पठण केले जाते. २० दिवस मक्का व २० दिवस मदीनात राहतात. जमजम (पवित्र पाणी) व खजुर येताना आणुन प्रसाद म्हणून वाटप करतात. आल्यावर शुक्रिया भोजन दिले जाते. गल्लीतील एकटा गेला की ती गल्ली पवित्र होते व गावातील पाचजण गेले की ते गाव पवित्र होते असे मानले जाते.-जावेद पटेल**




असे प्रतिपादन माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी केले. सोमवारी रात्री हजला जाणाऱ्या यात्रेकरूंना माजी गृह राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी रेल्वेस्थनाकावर जाऊन मुस्लिम बांधवाचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, नागनहळ्ळी संस्थेचे सचिव जावेद पटेल, हज यात्रेकरू अजीज शेख, नसीमा शेख आदीसह मुस्लिम बांधव उपस्थित होते.

या यात्रेला जाण्याची सुरूवात सोमवारी २७ मे पासुन झाली आहे. हजही मुस्लिम लोकांचीधार्मिक यात्रा आहे. ही यात्राअल-हिज्जाह या महिन्यामध्ये सौदी अरेबिया या देशातील मक्का या पवित्र शहरी भरते. शक्य असल्यास प्रत्येक मुसलमानाने आयुष्यातून एकदा तरी हीयात्राकरावी असा कुरानमध्ये आदेश आहे. ही एक पवित्रयात्राआहे. मक्का सौदी अरेबियायेथे हज आणि उमरा ही धार्मिक तीर्थक्षेत्रे आहेत. इस्लामिक धार्मिक शिकवण असे सांगते की प्रत्येक सक्षम-शरीर असलेल्या प्रौढ मुस्लिम ज्याला असे करणे शक्य आहे, त्याने त्यांच्या आयुष्यात एकदा तरी हज करणे बंधनकारक आहे. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक अजीज शेख, नसीमा अजीज शेख यांचे नातेवाईक, मुज्जमिल शेख, निसार शेख(सोलापूर), नुरोद्दीन शेख, इकरार शेख, सद्दाज शेख आदीसह बांधव उपस्थित होते.

१)अजीज शेख हज यात्रेकरू- ट्रेनने मुबंईला जाणार व तेथुन मक्काला पहिली ट्रीप २९ ला आहे. ४० दिवस लागतात. हज केल्याने पुण्य मिळते. जीवनात आल्यावर हज यात्रा, रोजा, नमाज, जकात हे चार प्रवित्र कर्तव्ये आहेत. त्यातील महत्वाचे हज आहे.

# टाकळीवाडीत श्री विठ्ठल बिरदेव यात्रा मोठ्या उत्साहामध्ये संपन्न

**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी ता.शिरोळ येथील देवस्थान विठ्ठल बिरदेव यात्रा अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये संपन्न झाली. गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. ढोल, फटाके तसेच महिलांच्या डोक्यावरती आंबील ची घागर घेऊन गावातून मिरवणूक निघाली. त्यानंतर आंबील खिचड्याचा नैवेद्य झाला. त्यानंतर



भाकणूक व धनगरी ओव्या चा कार्यक्रम संपन्न झाला . देवाला अभिषेक तसेच फुलांमध्ये आकर्षक असे सजवण्यात आले होते. भंडारा मध्ये भक्त न्याहाळून निघाले. पावसाने सुद्धा हजेरी लावल्यामुळे आनंदाचे वातावरण होते. महाप्रसादाने यात्रेची सांगता झाली. यावेळी समस्त गावकरी उपस्थिती होते.

# दादरच्या चित्रा थिएटरमध्ये पार पडला येड लागलं प्रेमाचं मालिकेचा शानदार प्रीमियर सोहळा

## ढोल-ताश्यांच्या गजरात कलाकारांची दमदार एण्ट्री

स्टार प्रवाह म्हणजे महाराष्ट्राची पहिली पसंती. स्टार प्रवाह वाहिनीने प्रेक्षकांना भावतील आणि दैनंदिन आयुष्याचा भाग वाटतील अश्या मालिकेच्या कथा आणि घरातील सदस्य वाटावीत अशी पात्र उभी करुन रसिकांचं भरभरुन मनोरंजन केलं आहे. मनोरंजनाचा हा प्रवाह असाच अखंडित ठेऊन नव्या मालिकांची पर्वणी स्टार प्रवाह वाहिनी घेऊन येत आहे. घरोघरी मातीच्या चुली आणि साधी माणसं नंतर स्टार प्रवाहवर सुरु झालीय नवी मालिका येड लागलं प्रेमाचं. दादर येथील चित्रा थिएटरमध्ये नुकताच या मालिकेचा दमदार प्रीमियर सोहळा पार पडला. याप्रसंगी मालिकेची संपूर्ण टीम उपस्थित होती. ढोल-ताश्यांच्या गजरात कलाकारांचं आगमन झालं आणि मालिकेची पहिली झलक चित्रा थिएटरमध्ये संपूर्ण टीमने एकत्र पाहिली.माणसाला अंतर्बाह्य बदलून टाकतं ते प्रेम. प्रेमात समोरच्याला बदलण्याचा अट्टहास नसतो, जे जसं आहे ते अगदी तसं त्याच्या पूर्ण गुण-दोषांसकट स्वीकारणं म्हणजे प्रेम. येड लागलं प्रेमाचं ही मालिकाही प्रेमातल्या वेडपणाची साक्ष देणारी असेल. महाराष्ट्राचं कुलदैवत अशी ओळख असणाऱ्या विठुरायाच्या पंढरपुर नगरीत या मालिकेची गोष्ट घडणार आहे. राया आणि मंजिरी या मालिकेतली प्रमुख पात्र. एकमेकांचा तिरस्कार करणाऱ्या राया आणि मंजिरीचा प्रेमात पडण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे येड लागलं प्रेमाचं ही मालिका. दख्खनचा राजा ज्योतिबा या मालिकेतून घराघरात पोहोचलेला अभिनेता विशाल निकम, स्वाभिमान मालिकेतील प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री पुजा बिरारी, लोकप्रिय अभिनेता जय दुधाणे या मालिकेत राया, जय आणि मंजिरीची भूमिका साकारताना दिसतील.स्टार प्रवाहच्या या नव्या मालिकेविषयी सांगताना स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'येड लागलं प्रेमाचं ही मालिका प्रेमामुळे बदलत जाणारी माणसं आणि मानसिक स्थिती यावर भर देत हळुवार भावना उलगडत पुढे जाणारी आहे. प्रेक्षकांना मालिकेत भव्यदिव्य सीक्वेन्स बघायला मिळतील आणि करमणूक प्रधान कथा पुढे सरकत जाईल.'राया या पात्राविषयी सांगताना अभिनेता विशाल निकम म्हणाला, 'स्टार प्रवाह माझं कुटुंब आहे. या कुटुंबात पुन्हा एकदा सामील होतोय याचा खूप आनंद आहे. मी आतापर्यंत साकारलेल्या भूमिकांपेक्षा वेगळं आणि हटके असं हे पात्र आहे. खऱ्या आयुष्यातही माझं आणि विठुरायाचं खास नातं आहे. माऊलींच्या आशीर्वादामुळेच इथवरचा प्रवास मी करु शकलो. माझ्या घरी वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. या मालिकेची गोष्ट देखिल पंढरपुरात घडते. त्यामुळे मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो अशी भावना विशाल निकम याने व्यक्त केली.'

अभिनेता जय दुधाणे या मालिकेच्या निमित्ताने पहिल्यांदाच पोलिसाची व्यक्तिरेखा साकारणार आहे. या अनुभवाविषयी सांगताना तो म्हणाला, 'मी पहिल्यांदा पोलिस इन्सपेक्टरची भूमिका साकारतोय. आव्हान खूप मोठं आहे. व्यायाम माझं पॅशन आहे. या भूमिकेसाठी शरीरयष्ठीवर जास्त मेहतन घेतोय. विशालसोबत याआधी काम केल्यामुळे आमची ओळख होतीच. पूजासोबत पण छान मैत्री जमली आहे. आम्हा तिघांचे सीन्स खूप छान होत आहेत. स्टार प्रवाहसोबतची पहिलीच मालिका असल्यामुळे मी जरा जास्त उत्सुक आहे.'अभिनेत्री पुजा बिरारीने शूटिंगच्या निमित्ताने पहिल्यांदा बैलगाडी चालवली आहे या अनुभवविषयी सांगताना ती म्हणाली, 'बैलगाडा शर्यत शूट करायची असं ठरल्यापासून मनात खूप उत्सुकता होती. मी कधीच बैलगाडी चालवली नाहीय. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभव घेण्याची खुपच उत्सुकता होती. पंढरपुरात आम्ही ही बैलगाडा शर्यत शूट केली. जवळपास ४ ते ६ दिवस या खास भागाचं शूट सुरु होतं. बैलगाडी नुसती चालवायची नव्हती तर ती शर्यतीत पळवायची होती. त्यामुळे खूप काळजी घेऊन शूट करावं लागत होतं. मी हा सीन बॉडी डबलची मदत न घेता केला. माझ्यासाठी हा अतिशय विलक्षण आणि अविस्मरणीय अनुभव होता. हा अनुभव माझ्या आठवणींच्या शिदोरीत कायम असेल.'

विशाल निकम, जय दुधाणे आणि पूजा बिरारीसोबतच मालिकेत नीना कुलकर्णी, अतिशा नाईक, उमेश नाईक, अभय राणे अशी दिग्गज कलाकार मंडळी आहेत. शैलेश शिर्सेकर दिग्दर्शकाची भूमिका पार पाडत असून सोल प्रोडक्शनने मालिकेची निर्मिती केली आहे. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका येड लागलं प्रेमाचं रात्री १० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

**स्टार प्रवाह संपर्क :सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**